# मधुकर सदाशिव पेठे - दूरशिक्षण अध्यापकांचे रोल मॉडल

- प्रा. विजयकुमार पाईकराव

मधुकर सदाशिव पेठेसरांचा आणि माझा पत्ररूप संपर्क मी अभिनव अध्यापक महाविद्यालय, लातूर येथे अध्यापकाचार्य म्हणून कार्यानंद करतांना १९९८ पासून सुरू झाला. उत्तम सुरेख वळणदार अक्षर, पत्रातील मुद्देसूदपणा अन् सुलभ मधाळ भाषा या मुळे कुणीही अध्यापक त्यांची भक्ती करे. तसा मी ही त्यांचा भक्त झालो.

भारतीय शिक्षण मासिकातील त्यांचे बहुआयामी हृदयस्पर्शी लेख मनाच्या गाभाऱ्यात थेट घर करून आहेत. आचार्य विनोबाजींनी वर्णन केलेल्या शिक्षकांच्या तीन्ही जीवननिष्ठा मला त्यांच्या लेखनातून सतत जाणवत असत. विज्ञाननिष्ठा, विद्यार्थीनिष्ठा, समाजनिष्ठा ह्यांचा संस्कार खऱ्या अर्थानी त्यांच्या लेखणीतून मला झाला.

सन २००० ते २०१२ या कालखंडातील सर्वच लेखातून मधुकर पेठे सरांच्या मार्गदर्शनाचा लाभ झालेला आहे. दूर शिक्षणातून अध्ययनार्थीस नित्यनूतन सनातन संस्कार कसे द्यायचे याचा वस्तुपाठ संवादपत्रिकेतून दिला. परिश्रम अन् प्रयत्नांनी स्वाध्याय गृहपाठ करण्यासाठी मुक्त विद्यापीठाच्या अध्ययनार्थीस मार्गदर्शनपर सूचना भारतीय शिक्षण मासिकाच्या कव्हर पेजवर घेण्याची माझी विनंती त्यांनी तात्काळ मान्य केली होती. मात्र सदर कार्यानंद पूर्ण करण्यास अनंत समस्या असल्यामुळे आम्ही हतबल झालो.

हसत खेळत माणसं कशी जोडावी हे त्यांच्याकडून शिकता आले. नवा उत्साह, नवी उमेद बोलण्यातून व लेखातून पेरण्याचे कार्य त्यांनी केले. सहकार्य मागणाऱ्यास आनंदी, समाधानी करणे हा त्यांचा गुण मला विशेष भावला आहे. खऱ्या अध्यापकाच्या अंतःकरणात अध्ययनाविषयी ओलाव्याचा महान वारसा त्यांच्या पत्रातून मिळाला. सतत आत्मनिरीक्षण, सिंहावलोकन, अनुमानयोजन आणि परस्परसंपर्कानी माणसे गुंफण्याची कला त्यांच्यात होती.

त्यांच्या मुद्रित साहित्यावरील सामर्थ्यावर पूर्ण विश्वास होता. माणसांची जीवने छापील पुस्तकाच्या पानांतून व्यक्त होऊन त्यांच्यावर त्याचे संस्कार चिरकाल होतात. वैफल्य, उदासीनता, निराशा ह्या बाबी त्यांच्या पासून चार हात लांबच असत. दुसऱ्याच्या कार्याची नवलाई, कल्पकता ते नेहमी वाखाणत असत. साधेपणा, शिस्त, विचारांनी, आचारांनी खूप श्रेष्ठ असे पेठेसर आम्हा शिक्षकांचे रोल मॉडेल होते. पेठेसर दूरशिक्षणातील अध्ययनार्थींची सुलभकांची, प्रेरकाची भूक आपल्या लेखातून पूर्ण करत. त्यांचे शिक्षणातील चिंतन संशोधन नवोशोधन आजही दीपस्तंभासारखे आहे. त्यायोगे संवादामधून पेठेसरांचा वसा एक तप बरोबर चालवता आला. त्यातील प्रत्येक मौलिक सूत्रे महाराष्ट्रातील दूरशिक्षण घेणाऱ्या अध्ययनार्थींनी व त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींनी स्वयंअध्ययनासाठी आत्मसात केली आहेत.